प्रेस नोट क्र. ११२/२०२४,
स्था.गु. शाखा, सांगली.
दिनांक ०६.११.२०२४

प्रेस नोट

## स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा सांगली यांची कामगिरी
## १० किलो गांजा जप्त करुन दोन आरोपी अटक

| पोलीस स्टेशन | अपराध क्र आणि कलम | फिर्यादी नाव |
|---|---|---|
| संजयनगर | गु.र.नं. २३३/२०२४, गुंगीकारक औषधी द्रव आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ चे कलम ८ (क), २० (ब) ii (ब) प्रमाणे. | पोहवा/१६७०, संकेत संजय मगदुम नेमणूक - स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, सांगली |
| **गु.घ.ता वेळ** | **गु.दा.ता वेळ** | **माहिती कशी प्राप्त झाली** |
| दि. ०५/११/२०२४ रोजी | ता. ०६/११/२०२४ रोजी | पोहवा/ अमोल ऐदाळे<br>पोहवा / संकेत मगदुम<br>पोहवा / अमसिध्दा खोत<br>पोहवा/ सतिश माने |

**कारवाई करणारे अधिकारी आणि अंमलदार**

मा. संदीप घुगे, पोलीस अधीक्षक, सांगली.
मा. रितु खोखर, अपर पोलीस अधीक्षक, सांगली.
यांचे मार्गर्शनाखाली
पोलीस निरीक्षक सतिश शिंदे, स्था. गु. अ. शाखा,
सहा. पोलीस निरीक्षक, नितीन सावंत व पो.उपनि/ कुमार पाटील, स्था. गु. अ. शाखा,
पोहेकॉ/ संकेत मगदुम, अमोल ऐदाळे, अमसिध्दा खोत, सतिश माने, बाबासाहेब माने, इम्रान मुल्ला,
पोना/ अनंत कुडाळकर, सुशिल मस्के, पोशि/ सोमनाथ पतंगे, सुमित सुर्यवंशी, रोहन घस्ते, सुशांत चिले
सायबर पोलीस ठाणेकडील कॅप्टन गुंडवाडे

**अटक वेळ दिनांक दि. ०५.११.२०२४ रोजी**

**आरोपीचे नांव पत्ता**

१) इनाममुलहसन बाबासाहेब शेख, वय २८ वर्षे, रा - राजीव गांधी कॉलनी, जुना कुपवाड रोड, सांगली
२) अरमान मिरासाब शेख, वय २० वर्षे, रा - राजीव गांधी कॉलनी, जुना कुपवाड रोड, सांगली
३) पाहिजे आरोपी - अरबाज ऊर्फ इप्तेखार बाबासाहेब शेख, रा - राजीव गांधी कॉलनी, जुना कुपवाड रोड, सांगली

**जप्त मुद्देमाल**

१) २,५०,१००/- रु एका पिशवीमध्ये काळपट हिरवे व काठपट रंगाचा फुलाची बोंडे असलेला तयार गांजा वजन १०.०२७ कि. ग्रॅ. असलेला
२) १,००,०००/- रु. एक पांढरे रंगाची मोपेड चार चाकी वाहन
—————————
**३,५०,२००/- ( तीन लाख, पन्नास हजार, दोनशे रुपये मात्र )**

**गुन्हयाची थोडक्यात हकीकत ——**

सध्या महाराष्ट्रात विधानसभा - २०२४ ची निवडणुक आदर्श आचारसंहिता लागु झालेली असुन त्या अनुषंगाने मा. पोलीस अधीक्षक, संदीप घुगे यांनी त्यांचे अधिनस्त स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, सांगली कडील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांचे विशेष पथक अंमली पदार्थ तस्करी, विक्री, वाटप व वितरण करणारे इसमांचेवर कारवाई करणेसाठी स्थापन करण्यात आलेले आहे.

Scanned with CamScanner

त्या अनुषंगाने दि. ०५.११.२०२४ रोजी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेकडील सहा. पोलीस निरीक्षक, नितीन सावंत यांचे पथकामधील पोहवा / संकेत मगदुम, पोहवा / अमसिध्दा खोत, पोहवा/ सतिश माने, पोहवा/ अमोल ऐदाळे व पोहेकॉ/ अमसिध्दा खोत यांना त्यांचे बातमीदाराकडून बातमी मिळाली की, एक इसम तयार गांजा विक्री करीता त्याचे मोपेड गाडीवरुन सांगली जुना कुपवाड रोड, दुधाळ कॉर्नर, सांगली येथुन येणार असल्याची खात्रीशीर बातमी मिळाली.

नमुद पथकास मिळाले बातमीप्रमाणे, दुधाळ कॉर्नर चौक तसेच लक्ष्मी मंदिर जाणारे रोडवर सापळा लावून थांबले असता बातमीप्रमाणे दोन इसम राजीव गांधी कॉलनी येथून दुधाळ कॉर्नर कडे येताना दिसले तसा त्यांचा बातमीप्रमाणे संशय आल्याने त्यांना थांबवून त्यांचे नाव गाव विचारता त्यांनी त्यांची नावे - १) इनाममुलहसन बाबासाहेब शेख, वय २८ वर्षे, रा - राजीव गांधी कॉलनी, जुना कुपवाड रोड, सांगली २) अरमान मिरासाब शेख, वय २० वर्षे, रा - राजीव गांधी कॉलनी, जुना कुपवाड रोड, सांगली अशी सांगितली. त्यांचेकडील मोपेड गाडीसमोर पायात ठेवलेल्या कापडी पिशवीत पाहिले असता त्यामध्ये हिरवट काळपट रंगाचा फुलाची बोंडे असलेला ओलसर गांजा मिळून आला. सदर गांजा मालाबाबत विचारले असता इनाममुलहसन शेख याने सदरचा गांजा माल हा त्याचा भाऊ अरबाज ऊर्फ इप्तेखार बाबासाहेब शेख याने आणला असून तो विक्री करीता ते दोघे घेवून चालले असल्याचे सांगितले.

लागलीच सदर आरोपी व गांजा माल सहा. पोलीस निरीक्षक, नितीन सावंत यांनी पंचासमक्ष जप्त करून संजयनगर, पोलीस ठाणेस याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास संजयनगर, पोलीस ठाणे करीत आहेत.

( सतिश शिंदे )
पोलीस निरीक्षक,
स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, सांगली.

Scanned with CamScanner